# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५**
**दूरध्वनी: २२१६३९६४/६५/६९**
**ई-मेल :** mercindia@merc.gov.in
**संकेत-स्थळ :** www.merc.gov.in

## जाहीर सूचना

**प्रारुप "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाजाचे नियम आणि शुल्क व आकार) (दुसरी सुधारणा) विनियम, २०२५ वर अभिप्राय मागविण्याबाबत**

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (मविनिआ किंवा आयोग) प्रारुप "मविनिआ (कामकाजाचे नियम आणि शुल्क व आकार) (दुसरी सुधारणा) विनियम, २०२५" तयार केले आहेत.

२. हे प्रारुप विनियम त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह, आयोगाच्या www.merc.gov.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात ठेवण्यात आले आहेत.

३. प्रारुप सुधारणा विनियमांवरील अभिप्राय, सूचना किंवा हरकती आयोगाच्या (www.merc.gov.in/e-public-consultation) संकेत-स्थळावरील '**E-public Consultation**' या टॅबद्वारे या सूचनेच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या आत अपलोड करता येतील. या टॅबचा वापर करण्यात कोणतीही अडचण आल्यास संबंधित व्यक्ती कामकाजाच्या सर्व दिवसांमध्ये सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.०० या दरम्यान मोबाईल क्र. ८९२८०७१५२२ वर किंवा suggestions@merc.gov.in या ई-मेल आयडीवर संपर्क साधू शकतात. **'E-Public Consultation'** या टॅबवर सूचना आणि हरकती अपलोड केलेल्या व्यक्तीस त्याच्या निवेदनाची छापील प्रत दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर करणे शक्य नसेल त्यांनी त्यांच्या सूचना आणि हरकतींची छापील प्रत, सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४०० ००५ या पत्त्यावर दि. २१ फेब्रुवारी, २०२५ रोजी सायंकाळी ५.०० पूर्वी दाखल करावी. अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे दाखल करण्यात आलेल्या सूचना/हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

४. दि.२१ फेब्रुवारी, २०२५ रोजी किंवा त्याआधी अपलोड केलेले किंवा प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती वरील प्रारुप विनियमांना अंतिम स्वरुप देण्यापूर्वी आयोगाकडून विचारात घेण्यात येतील. या विषयावरील पुढील सर्व पत्रव्यवहार आयोगाच्या www.merc.gov.in या संकेत-स्थळाच्या माध्यमातूनच होईल.

दिनांक: ३१.१.२०२५
ठिकाण: मुंबई

**(डॉ. राजेंद्र गं. आंबेकर)**
**सचिव, मविनिआ**